# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## वृत्तप्रेस

**विषयः- हिवाळी -२०१७ परीक्षेकरीता प्रवेशित होणा-या बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारणे बाबत..**

सर्व सबंधितांना कळविण्यात येते की, हिवाळी -२०१७ च्या परीक्षेपासून विद्यापीठाच्या सर्व परीक्षा सत्र पध्दतीने होण्यासाठी दिनांक २७/०६/२०१७ चे निदेश क्र.९/२०१७ व १०/२०१७ निर्गमित झाले असल्यामुळे बहिःशाल विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षेला प्रवेशित होता येणार नाही. परंतु बहिःशाल विद्यार्थ्यांना कळविण्यात आनंद होत आहे की फक्त हिवाळी -२०१७ परीक्षेकरीता बहिःशाल विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन मुदतपूर्वी व मुदतीनंतर विलंबशुल्कासह प्राप्त होणारे परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याबाबत मा.कुलगुरु डॉ.श्री.एम.जी.चांदेकर यांनी निदेश दिले आहेत. ही संधी फक्त हिवाळी -२०१७ परीक्षेकरीताच असल्यामुळे उन्हाळी -२०१८ परीक्षेपासून बहिःशाल विद्यार्थ्यांना परीक्षेला प्रवेशित होता येणार नाही. बहिःशाल म्हणून परीक्षेला प्रवेशित होणा-या विद्यार्थ्यांना ही शेवटची सुवर्ण संधी असून मा.कुलगुरुंनी उपलब्ध करून दिलेल्या संधीचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,डॉ.श्री.जे.डी.वडते यांनी केले आहे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

दि.31.07.2017